महाराष्ट्र शासन
मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)

जा.क्र/स्मार्ट/उपप्रकल्प अं.ब/१२३५/२०२२ दि.२५ /०७/२०२२

प्रति,

१) नोडल अधिकारी, पीआययू, कृषि, पशुसंवर्धन, माविम, MSRLM, VSTF
२) नोडल अधिकारी, आरआययू, सर्व
३) नोडल अधिकारी, डीआययू, सर्व

विषय :- स्मार्ट अंतर्गत उपप्रकल्प मंजूरीनंतर प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा आणि सीबीओ यांनी स्व:हिस्सा उभारणी आणि सीबीओचे बँकेत खाते उघडणे इ. बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत..

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीमध्ये (SPAC) समुदाय आधारीत संस्थांच्या उपप्रकल्पांना मान्यता दिली जाते. समितीने मंजूर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना / उपप्रकल्पांना मंजूरीचे आदेश संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत निर्गमित करण्यात येतात. या मंजूरी आदेशानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

१) **स्व:हिस्सा उभारणी :-** स्मार्ट प्रकल्पात सीबीओंना मिळणारे अनुदान उपप्रकल्पाच्या किंमतीच्या ६०% पर्यंत राहणार आहे. तथापि बाब निहाय मापदंडाच्या आधारे अनुदान निश्चित होत असल्यामुळे बहुतांश वेळी अनुदान हे ६०% पेक्षा काही प्रमाणात कमी राहू शकते. सीबीओनी स्व:हिस्स्याची उभारणी बँक कर्ज घेवून (Loan Case) अथवा बँक कर्ज न घेता पुर्ण रक्कम स्वत: उभारुन (No Loan Case) या दोन पैकी एका पध्दतीने करणे अपेक्षित आहे. बँक कर्ज घेणे बंधनकारक नाही. या दोन्ही प्रकारामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
१	उपप्रकल्पाला मंजूरी मिळाल्यानंतर स्मार्ट अंतर्गत उपप्रकल्प राबविणेसाठी सीबीओने स्वतंत्र चालु खाते कोणत्या बँकेत उघडावे?	१) कर्ज घेण्यासाठी बँक निश्चित केलेली नसल्यास आणि बँक ऑफ महाराष्ट्रामधून कर्ज घेण्यास संम्मती असल्यास नजिकच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत २) बँक ऑफ महाराष्ट्र शिवाय अन्य बँकेतून कर्ज घेणार असल्यास ज्या	१) बँक ऑफ महाराष्ट्राच्या नजिकच्या शाखेत खाते उघडणे अनिवार्य	१) बँक ऑफ महाराष्ट्र उपप्रकल्प मंजूर झालेल्या सर्व सीबीओंना राज्यस्तरावरुन तत्वत: कर्ज मंजूरीचे पत्र द्यायला तयार आहे. म्हणुन अन्य बँकेतून कर्ज घेणार नसल्यास प्राथम्याने

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, 270, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016 (महाराष्ट्र)
दूरभाष: ०२०२५६५६५७७/८ वेबसाईट: www.smart-mh.org ईमेल: pcmu.smart@gmail.com

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
		बँकेतून कर्ज घेणार आहे त्या बँकेच्या नजिकच्या शाखेत		महाराष्ट्र बँकेत कर्ज प्रकरण केल्यास प्रकल्पामार्फत पाठपुरावा करण्यात येईल. २) No Loan Case मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र प्रकल्पासाठी MIS तयार करुन देणार आहे आणि प्रकल्पाची सर्व कार्यालयाची खाती लवकरच बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे. म्हणुन No Loan Case मध्ये बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये खाते उघडणे अनिवार्य आहे.
२	स्मार्ट अंतर्गत उपप्रकल्प राबविणेसाठी सीबीओचे स्वतंत्र चालु खाते कोणी कार्यान्वित करावे / स्वाक्षरीचे अधिकार कोणाला असतील?	सीबीओचे दोन संचालक	१) पीआययू कृषि बाबत - सीबीओचे दोन संचालक आणि प्रकल्प संचालक, आत्मा २) पीआययू कृषि व्यतिरिक्त अन्य पीआययू बाबत - सीबीओचे दोन संचालक आणि संबंधित पीआययूचा प्रतिनिधी	No Loan Case मध्ये बँक खाते त्रिपक्षीय स्वाक्षरीने कार्यान्वित होणार असले तरी एकावेळी रु.५.०० लाखापर्यंतच्या मर्यादेतील खर्चासाठी फक्त सीबीओच्या दोन अधिकृत संचालकांच्या स्वाक्षरीने व्यवहार करता येईल. ही अट टाकून खाते काढावे.

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
३	अनुदान करार (Grant Agreement) केव्हां करावा?	कर्ज मंजूर झाल्यानंतर	स्व:हिस्स्याची पहिली खिस्त (पहिल्या टप्याच्या अनुदानाच्या प्रमाणात अपेक्षित रक्कम) बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखेत उघडलेल्या प्रकल्पासाठीच्या स्वतंत्र चालू खात्यात जमा झाल्यावर	-
४	अनुदान करार (Grant Agreement) कोणा कोणामध्ये असेल?	१) पीआययू कृषि बाबत - कर्ज मंजूर केलेल्या बँकेच्या शाखेचा व्यवस्थापक, सीबीओचा अधिकृत संचालक, प्रकल्प संचालक, आत्मा २) पीआययू कृषि व्यतिरिक्त अन्य पीआययू बाबत - कर्ज मंजूर केलेल्या बँकेच्या शाखेचा व्यवस्थापक, सीबीओचा अधिकृत संचालक, संबंधित पीआययूचे नोडल अधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला त्यांचा प्रतिनिधी	१)पीआययू, कृषि संबंधित सीबीओ बाबत - बँक ऑफ महाराष्ट्रात खाते जिथे उघडले आहे त्या शाखेचा व्यवस्थापक, सीबीओचा अधिकृत संचालक, प्रकल्प संचालक, आत्मा २)पीआययू, कृषि व्यतिरिक्त अन्य पीआययू बाबत - बँक ऑफ महाराष्ट्रात खाते जिथे उघडले आहे त्या शाखेचा व्यवस्थापक, सीबीओचा अधिकृत संचालक, संबंधित पीआययूचे नोडल अधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला त्यांचा प्रतिनिधी	१) स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीच्या पदा बाबतच्या शिक्क्यासह स्वाक्षरी करावी. स्वाक्षरीच्या खाली नाव व हुद्दा नमुद करावा. २) सीबीओस बँक खाते उघडण्यास व अनुदान करारावर व्यवस्थापकांची स्वाक्षरी मिळण्यास अडचणी येत असल्यास बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्य शाखा, पुणे येथील श्री. सचिन लोहकरे (मोबाईल नंबर ९४२३२१८३८७) यांचेशी संपर्क साधावा.

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
५	उपप्रकल्पात प्रस्तावित बांधकाम अथवा यंत्रसामुग्री इ. बाबत खरेदी प्रक्रीया कशी असेल?	मा.प्रकल्प संचालक स्मार्ट तथा आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने समुदाय आधारित संस्थाचे (CBO) मंजूर उपप्रकल्प राबविताना अवलंब करावयाच्या संपादनाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र.स्मार्ट/ पीसीएमयू/सीबीओ/सं.मा. सू/६६७/२० दि.१३/०७/२० रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तथापि या परिपत्रकात नमुद तांत्रिक मान्यतेची आवश्यकता नाही, कारण उपप्रकल्पातील घटकांचे अनुदान शासकीय योजनांच्या मापदंडाप्रमाणे मंजूर केलेले आहे. (म्हणुन त्यास कोणत्याही तांत्रिक मान्यतेची आवश्यकता नाही)	Loan Case प्रमाणेच	संपादनाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र.स्मार्ट/ पीसीएमयू/सीबीओ/सं. मा.सू/६६७/२० दि.१३/०७/२०२० या परिपत्रकात काही बदल प्रस्तावित असून ते आपणास लवकरच कळविण्यात येतील.
६	उपप्रकल्पात प्रस्तावित बांधकाम अथवा यंत्रसामुग्री इ. बाबत खरेदीस पुर्वमान्यता	मार्गदर्शक सूचना जा.क्र.स्मार्ट/पीसीएमयू/ सीबीओ/सं.मा.सू/६६७/२० दि.१३/०७/२०२० तथापि पुर्वमान्यता घेण्याची प्रक्रीया उपप्रकल्पाला मंजूरी मिळताच सुरु करावी. यासाठी स्व:हिस्सा जमा होण्याची किंवा कर्ज मंजूर होण्याची वाट पाहू नये जेणेकरुन या प्रक्रीयेसाठी लागणारा वेळ वाचेल.	Loan Case प्रमाणेच	-

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
७	सीबीओंच्या मंजूरी आदेशात बांधकाम (गोदाम,शेड, प्रक्रीया युनीट इ.) मंजूर असल्यास RIU ने त्याबाबतची पडताळणी कशी करावी?	सीबीओंच्या मंजूरी आदेशात बांधकाम (गोदाम, शेड, प्रक्रीया युनीट इ.) मंजूर असल्यास RIU मधील पुरवठा मूल्यसाखळी तज्ञ आणि संनियंत्रण व मुल्यमापन व MIS तज्ञ यांनी सीबीओस भेट देवून सदर बांधकाम आवश्यक आहे का? तसेच योग्य क्षमतेचे (मे.टन/ चौ.मी/ चौ.फुट) आहे का? अनावश्यक बांधकाम नाही ना? याची पडताळणी करावी. पडताळणीचे पत्र संबंधित पीआययुंना सादर करावे.	Loan Case प्रमाणेच	अनुदान मागणी सादर करताना सदर पडताळणी अहवाल सादर करावा.
८	सीबीओने मंजूर बांधकामास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी कशी घ्यावी?	सीबीओस मंजूर गोदाम बांधकाम / शेड बांधकाम करणेस सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता घेवून बांधकामास सुरुवात करावी. (ग्रामपंचायत, नगरविकास, नगरपालिका इ.) सदर प्राधिकाऱ्याचा नाहरकत म्हणजे बांधकाम परवाना होत नाही. (बांधकाम परवाना नमूना ग्रामपंचायत व नगरपंचयात सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.) शासन निर्णय	Loan Case प्रमाणेच	अनुदान मागणी सादर करताना सदर मंजूरी अनिवार्य राहील.

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
		कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र.कृराधो-१४१७/प्र.क्र.१०९/९-अे, दिनांक ०६ जून २०१८ अन्वये सूक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी NA ची आवश्यकता नाही. (सोबत शासन निर्णय सहपत्रित करण्यात येत आहे.) बांधकाम मंजूरी प्राधिकाऱ्याने NA परवानगी मागितल्यास सदर शासन निर्णयान्वये NA ची आवश्यकता नसल्याचे कळवावे.		
९	पहिल्या हप्त्याची अनुदान मागणी केंव्हा करावी?	१) सीबीओस बँक कर्ज मंजूर झाल्यास २) अनुदान करार झाल्यास ३) बांधकाम परवाना / मंजूरी पत्र मिळाल्यास	१) सीबीओ स्वाहिस्सा रक्कम बँक खात्यात जमा असल्यास २) अनुदान करार झाल्यास ३) बांधकाम परवाना / मंजूरी पत्र मिळाल्यास	-
१०	पहिल्या हप्त्याची अनुदान मागणी सोबत जोडावयाची कागदपत्रे	सीबीओचे अनुदान मागणी पत्र, टॅली प्रमाणपत्र, बँकेचे Loan Sanction Letter व व्यवस्थापक तसेच सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक	सीबीओचे अनुदान मागणी पत्र, टॅली प्रमाणपत्र, बँकेचे व्यवस्थापक तसेच सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट तसेच	-

अ. क्र	बाब	Loan Case	No Loan Case	शेरा
		स्टेटमेंट तसेच RIU चे बांधकाम क्षमता योग्य असल्याचे पत्र सादर करावे.	RIU चे बांधकाम क्षमता योग्य असल्याचे पत्र सादर करावे.	

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून प्रथम अनुदान हप्त्याची मागणी तात्काळ करावी.

सोबत :-

१) बँक ऑफ महाराष्ट्र आणि स्मार्ट प्रकल्प यांच्या सामंजस्य कराराची प्रत

२) Loan Case आणि No Loan Case बाबत अनुदान करार (Grant Agreement) चा विहीत नमुना

३) समुदाय आधारित संस्थाचे मंजूर उपप्रकल्प राबविताना अवलंब करावयाच्या संपादनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १३/०७/२०२०.

४) अनुदान मागणी नमुना व टॅली प्रमाणपत्र नमूना

५) बांधकाम परवाना / मंजूरी पत्राचा नमूना

६) NA शासन निर्णय

(दशरथ तांभाळे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, 270, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016 (महाराष्ट्र)
दूरभाष: ०२०२५६५६५७७/८ वेबसाईट: www.smart-mh.org ईमेल: pcmu.smart@gmail.com